# व्यापक संवेदनशीलता आवश्यक

मासिक पाळी हा महिलांच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील विषय. एका अर्थाने त्यांचे आयुष्य व्यापणारा मुद्दा. कारण कौटुंबिक प्रजनन चक्र या विषयाशी जोडले गेले आहे. तरी सार्वजनिकरीत्या त्यावर चर्चा करण्यास बहुसंख्य महिलांची तयारी आढळत नाही. कर्नाटक सरकारने घेतलेल्या एका निर्णयामुळे हा विषय चर्चेत आला आहे. त्या सरकारने दर महिन्याला महिलांना एक दिवसाची मासिक पाळी रजा मंजूर केली आहे. सरकारी, खासगी आणि औद्योगिक पातळीवर हा निर्णय लागू करण्यात आला आहे. असा निर्णय याआधी काही राज्यांनी आणि खासगी आस्थापनांनीदेखील त्यांच्या पातळीवर अंमलात आणला आहे. या निर्णयाचे महिला स्वागत करतील. समानतेच्या मुद्यावरून महिलांशी संबंधित अशा अनेक निर्णयांची संभावना अनेक जण करताना आढळतात. समानतेच्या मुद्यावर आंदोलने करणाऱ्या महिलांचा दुटप्पीपणा, असेही मत काही जण नोंदवतात. हा वादविवाद क्षणभर बाजूला ठेवला तरी मासिक पाळीच्या दिवसांमध्ये महिलांमधील संप्रेरकांमध्ये बदल होतो. त्याचा महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. याच काळात शाळेत अनुपस्थित राहणाऱ्या मुलींचे प्रमाण म्हणूनच लक्षणीय आहे. संप्रेरकांमधील बदलाइतकाच; किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त परिणाम मासिक पाळीशी जोडल्या गेलेल्या प्रथा आणि परंपरांच्या ओझ्याचाही होतो. त्यामुळे हा विषय वैचारिक प्रगल्भतेने हाताळल्याबद्दल महिला कर्नाटक सरकारला धन्यवाद देतील. मासिक पाळीच्या दिवसात विश्रांती घेणे आरोग्यदायी ठरू शकते, असे वैद्यकीय तज्ज्ञ सुचवतात. उपरोक्त निर्णय हे कर्नाटक सरकारचे त्या दिशेने पडलेले पाऊल ठरू शकेल. मासिक पाळीवर चर्चा करण्यास, समस्या सांगण्यास हा निर्णय महिलांसाठी प्रेरक ठरू शकेल. हीच संवेदनशीलता महिलांशी संबंधित अनेक सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यात प्रवृत्त करू शकेल. महिलांसाठी सार्वजनिक आणि स्वच्छ स्वच्छतागृहांची कमतरता ही अशीच एक समस्या. जी त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिमाण करते. महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर महामार्गावर प्रत्येक पंचवीस किलोमीटर अंतरावर सुसज्ज स्वच्छतागृह बांधायचे राज्य सरकारने ठरवले आहे. तशी ती बांधली गेलीच पाहिजेत. पण सध्या तशी सुविधा नाही, असा याचा सरळ अर्थ आहे. उभारलेल्या स्वच्छतागृहांची देखभाल-व्यवस्थापन महिला बचतगटांमार्फत केले जाईल आणि महामार्गावर बचतगटांना त्यांच्या उत्पादनांची विक्री करण्याची व्यवस्था केली जाईल, असेही संबंधित मंत्र्यांनी माध्यमांना सांगितले. पण त्यासाठी आधी स्वच्छतागृहे उभारली तर गेली पाहिजेत. मुळात हा 'राईट टू पी' हा आंदोलनाचा विषय बनला यातच याकडे बघण्याचा समाजाचा आणि सरकारचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. २०११ मध्ये हे आंदोलन राबवले गेले. तोपर्यंत महिलांना अशी गरज भासू शकते हे तोपर्यंत लक्षातच आले नसावे. हा मुद्दा प्राधान्यक्रमाच्या अभावानेदेखील आढळला नसावा. त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यात याही आंदोलनाची चेष्टा उडवली गेली. पण महिलांनी आंदोलनाला बळकटी दिली होती. आधुनिक काळाच्या तुलनेत अनेकांना हा मुद्दा किरकोळ वाटू शकेल. तथापि, केवळ अशी सुविधा उपलब्ध नाही म्हणून घराबाहेर पडणाऱ्या महिलांना अनेक तडजोडी कराव्या लागतात. बहुसंख्य जणी पाणी पिणे टाळतात. याचे विपरीत परिणाम त्यांनाच सहन करावे लागतात. अशीच पंचाईत स्तनदा मातांची होते. सार्वजनिक ठिकाणी बाळाला दुग्धपान करणे त्यांना सहज शक्य व्हावे म्हणून सार्वजनिक ठिकाणी हिरकणी कक्ष उभारणे राज्य सरकारने बंधनकारक केले. पण संवेदनशीलता तिथपर्यंतच मर्यादित राहू नये. कारण अनेक ठिकाणी तसे कक्ष उभारण्यात आलेले नाहीत. घेतलेले निर्णय अंमलात आणले जातील याची दक्षता घ्यायला हवी. सामाजिक असुरक्षितता हा आणखी एक गंभीर मुद्दा. शारीरिक अत्याचाराच्या देशभरातील घडलेल्या घटना सध्या चर्चेत आहेत. मुलींनी रात्री बाहेर पडू नये अशी टिप्पणी ममता बॅनर्जी यांनी एका घटनेसंदर्भात बोलताना नुकतीच केली. ती आक्षेपार्ह आहेच. कारण महिलांना सामाजिक सुरक्षित वातावरण निर्माण करून देणे हे सरकारांचे कर्तव्य आहे. ते न करता महिलांनाच सल्ला देणे म्हणजे चोराच्या उलट्या बोंबाच की. तेव्हा मुद्दा मासिक पाळीचा असो अथवा महिला म्हणून सामाजिक परिस्थितीचा, सरकारी संवेदनशीलतेचा परिघ विस्तारणे काळाची गरज आहे.

## मिरचीने दिले गावाला नाव

**गावाची गोष्ट**

**पायल छाजेड**

निफाड तालुक्यातील मिरचीचे पालखेड या गावात सुपीक जमीन व अनुकूल हवामानामुळे मिरचीची शेती केली जाई. व्यापारी दूरदूरहून खरेदीसाठी येत असत. हाच मिरची व्यापार गावाच्या नावाशी जोडला गेला. गावात ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळे आहेत. त्यापैकी प्रमुख म्हणजे काशी विश्वेश्वर मंदिर. ते अठराव्या शतकात अहिल्याबाई होळकरांच्या काळात बांधण्यात आले. दगडी चिरेबंदी भिंती, तुरीचे खांब आणि सुबक शिल्पकला हे त्याचे खास वैशिष्ट्य होते. मंदिराशेजारील बारव पाणीपुरवठ्याचा महत्त्वाचा भाग होती. राष्ट्रसंत जगद्गुरू जनार्दन स्वामी महाराजांना काशी विश्वेश्वराचा दृष्टांत येथे झाला होता. त्याआधारे महाराजांनी जीर्णोद्धाराची आज्ञा दिली. सन २००० मध्ये पुनःजीर्णोद्धार कार्य पूर्ण झाले. आणखी एक ऐतिहासिक ठेवा म्हणजे शिंदे वाडा. हा वाडा लाकडी खांब, माती आणि दगड यांच्या सहाय्याने बांधला असून जीर्णावस्थेत आहे. तरी त्याचे बांधकाम कौशल्य कौतुकास्पद आहे. वाड्यातून थेट बारवेपर्यंत एक भुयारी मार्ग होता. हा मार्ग त्या काळात केवळ आपत्तीच्या वेळीच नव्हे, तर वाड्यातील स्त्रिया सुरक्षितरीत्या पाणी आणण्यासाठी वापरत असत. मार्ग मातीने बंद झाला असला तरी बारव अस्तित्वात आहे. तिच्या दोन्ही बाजूंना पायऱ्या असून त्या थेट तळापर्यंत उतरतात. बारवेची ही सुबक रचना त्या काळातील जलव्यवस्थापन आणि स्थापत्य कलेचे जिवंत उदाहरण आहे. गावात दोन हनुमंत रायांची आणि दोन शनिदेवांची मंदिरे आहेत. पश्चिम भागातील हनुमंत रायाच्या मंदिरासमोरदेखील एक बारव आहे, जिची रचना दोन्ही बाजूंनी उतरणाऱ्या पायऱ्यांमुळे वैशिष्ट्यपूर्ण वाटते. खंडोबाच्या मंदिरात दांडी पौर्णिमेच्या दिवशी येथे यात्रेचे आयोजन केले जाते. राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली पर्णकुटी आजही आहे. या पवित्र स्थळी दर महिन्याच्या प्रदोष व्रताच्या दिवशी कार्यक्रम आयोजित केला जातो. दूरवरून येणारे भाविक येथे भगवान शंकराची उपासना करतात. त्यामुळे या पर्णकुटीला आजही आध्यात्मिक ऊर्जेचे केंद्रस्थान मानले जाते. काही शतकांपूर्वी आज जिथे गाव आहे, त्याच्या पश्चिम दिशेला काही मैलांवर जुने पालखेड वसलेले होते. तेथे तुरळक लोकवस्ती होती. परंतु मिरची व्यापार, बाजारपेठेमुळे लोकांनी सध्याच्या ठिकाणी स्थायिक होण्यास सुरुवात केली.

# संकटग्रस्त महाराष्ट्राला केंद्र सरकारचा ठेंगा?

**काही वर्षांपूर्वी गुजरातला तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसला होता. त्यावेळी मोदींनी तत्काळ एक हजार कोटींच्या तातडीच्या मदतीची घोषणा करताना गुजरात सरकारला कागदी घोडे नाचवण्यास सांगितले नव्हते. आता पूरग्रस्तांच्या मदतीसाठी महाराष्ट्र सरकारकडून अहवाल मागितला जात आहे.**

**मुंबई वार्तापत्र**

**उद्धव ढगे-पाटील**

यंदा मे महिन्यापासून बरसणाऱ्या पावसाने १० ऑक्टोबरपासून परतीचा प्रवास सुरू केला आहे. बुधवारपर्यंत राज्यातून मान्सून माघार घेईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे सरकारी यंत्रणेला आता पूरग्रस्तांना मदत करण्यावर लक्ष केंद्रित करता येईल. राज्यात जवळपास पाच महिने रेंगाळलेल्या पावसाने सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मोठा तडाखा दिला. अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अस्मानी संकटामुळे बळीराजा रडकुंडीला आला असताना सरकारी मदतीवरून सध्या राजकारण रंगले आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनी पूरग्रस्त भागाला भेटी देऊन शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षाने शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि हेक्टरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी केली. राज्यात पूरपरिस्थितीचे संकट असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा शिर्डीच्या दौऱ्यावर होते. त्यांनी आपल्या भाषणात राज्य सरकारला प्रस्ताव पाठवण्याची सूचना केली. प्रस्ताव आल्यानंतर दोन दिवसात महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना मदत जाहीर करतो, असा शब्द शहा यांनी पंतप्रधान मोदींच्या वतीने दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारला मदतीचे निवेदन पाठवले. परंतु मदतीबाबत केंद्राकडून अद्याप कोणतीही हालचाल झालेली नाही.

विरोधी पक्षाचा दबाव वाढत असताना शेवटी गेल्या आठवड्यात केंद्राच्या मदतीची वाट न पाहता मुख्यमंत्री फडणवीस यांनी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. सरकारने घोषित केलेल्या पॅकेजचा आकडा निश्चितच मोठा आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून मदत मिळण्याबाबत साशंकता व्यक्त होत आहे. चार-साडेचार वर्षांपूर्वी गुजरातला तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसला होता. त्यावेळी मोदींनी हवाई पाहणी करून तत्काळ एक हजार कोटींच्या तातडीच्या मदतीची घोषणा केली होती. तेव्हा मोदींनी गुजरात सरकारला कागदी घोडे नाचवण्यास सांगितले नव्हते. आता पूरग्रस्तांच्या मदतीसाठी महाराष्ट्र सरकारकडून अहवाल मागितला जात आहे. मदतीबाबत केंद्राकडून विलंब होणार हे लक्षात आल्याने पॅकेजमध्ये निकषांच्या पलीकडे जात मदत केल्याचा सरकारचा दावा आहे. अशातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असल्याने सत्ताधारी आमदारांच्या आग्रहाखातर सरकारने २५३ तालुक्यांना मदत आणि उपाययोजना लागू केल्या आहेत. नजीकच्या काळात संकटग्रस्त तालुक्यांची संख्या वाढून जाहीर केलेल्या ३२ हजार कोटींच्या मदतीपेक्षा सरकारला अधिकची मदत करावी लागू शकते. जवळपास सात लाख कोटींचा अर्थसंकल्प असलेल्या महाराष्ट्र सरकारला ३२ हजार कोटींचा बोजा पेलणे अवघड नाही. राज्य सरकारने पॅकेज जाहीर करून केंद्राकडून मदतीची फारशी अपेक्षा नसल्याची कबुली एकप्रकारे दिली आहे. त्यामुळे संकटग्रस्त महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून मदतीच्या बाबतीत ठेंगा मिळाल्याची चर्चा आहे.



राज्यात किंवा केंद्रात कोणतेही सरकार असो, त्यांना पॅकेज हा शब्द भलताच प्रिय असतो. अनेकदा अशी पॅकेजेस कागदावरच राहतात. तरीही सत्ताधाऱ्यांना पॅकेज जाहीर करण्याचा सोस असतो. सर्वसाधारणपणे अर्थसंकल्पातील तरतुदींची गोळाबेरीज करून केलेल्या मदतीच्या आकड्यांना पॅकेज म्हणून ओळखले जाते. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजीनगरला राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेतली होती. या बैठकीत मराठवाड्यासाठी ४६ हजार ५७९ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. २०१६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मराठवाड्यासाठी ४९ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली होती. या पॅकेजचे पुढे काय झाले हे आज घोषणा करणाऱ्यांनाही सांगता येणार नाही. वर्षातून एकदा उपराजधानी नागपूरला राज्य विधिमंडळाचे अधिवेशन भरते. या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विदर्भाच्या विकासासाठी पॅकेज जाहीर करण्याची प्रथा पडली आहे. अशी हजारो कोटी रुपयांची पॅकेज प्रत्यक्षात कागदावरच राहतात, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. त्यामुळे गेल्या आठवड्यात पूरग्रस्तांसाठी जाहीर झालेली मदत खरोखर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणार की नाही, अशी शंका व्यक्त होत आहे. कारण शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मध्यंतरी एक्स या समाज माध्यमाद्वारे जून २०२२ पासून राज्य सरकारने अवकाळी पाऊस, पूरस्थिती, गारपीट, अतिवृष्टीसाठी वेळोवेळी जी १३ हजार ८१९ कोटींची मदत जाहीर केली ती शेतकऱ्यांना मिळालीच नाही, असा दावा केला आहे. ही माहिती खरी असेल तर राज्य सरकारचे पॅकेज म्हणजे आकड्यांची रंगसफेदी ठरेल.

### अजितदादांना डोकेदुखी

पक्षातील वाचाळवीर मंत्र्यांमुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची डोकेदुखी दिवसेंदिवस वाढली आहे. शेतकऱ्यांविषयी वाटेल ते बोलणाऱ्या माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषी खाते काढून घेतल्यानंतर इतर मंत्री या कारवाईपासून धडा घेतील, ही अजितदादांची अपेक्षा सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी फोल ठरवली आहे. लातूरचे बाबासाहेब पाटील हे तसे शांत आणि मितभाषी स्वभावाचे! त्यांनी आपल्या विधानातून वाद ओढवून घेतला असे आतापर्यंत तरी घडलेले नाही. परंतु गेल्या आठवड्यात जळगाव जिल्ह्यातील एका कार्यक्रमात बाबासाहेब पाटील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल बोलून गेले. विरोधी पक्ष कर्जमाफीच्या मागणीसाठी आक्रमक झाला असताना शेतकऱ्यांना कर्जमाफीचा नाद लागल्याचे विधान करत पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले. पाटील यांच्या विधानातून शेतकरी कर्जमाफीच्या प्रश्नावर अप्रामाणिकता आणि असंवेदनशीलता दिसून आली. आम्ही निवडणुका जिंकण्यासाठी काहीही आश्वासन देतो, याची प्रामाणिक कबुली पाटील यांनी दिली असली तरी त्यांचे शेतकरी कर्जमाफीबद्दलचे विधान अक्षम्य आहे. अजित पवार यांनी आपल्या अशा वाचाळ मंत्र्यांना वेळीच आवरायला हवे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आहेत. जबाबदार मंत्र्यांची जीभ अशीच सैल सुटली तर त्याचा फटका आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला बसू शकतो.

### योगेश कदम पुन्हा वादग्रस्त

मुंबईतील सावली बारच्या वादानंतर पुण्यातील कुख्यात गुंड नीलेश घायवळचा भाऊ सचिनला शस्त्र परवाना मंजूर करण्याच्या निर्णयावरून गृहराज्यमंत्री योगेश कदम पुन्हा वादग्रस्त ठरले आहेत. योगेश कदम यांनी सुनावणी घेऊन सचिन घायवळचा शस्त्र परवाना मंजूर केला. मात्र, पोलिसांनी गृहराज्यमंत्र्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. याप्रकरणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी पुन्हा एकदा योगेश कदम यांना लक्ष्य करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. योगेश कदम हे पहिल्यांदाच मंत्री झाले आहेत. मंत्री झाल्यापासून त्यांच्यावर सतत आरोपांची मालिका सुरू आहे. त्यामुळे आपल्या मुलाला वाचवण्यासाठी शेवटी शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांना मैदानात उतरावे लागले. त्यांनी अनिल परब यांच्या टीकेचा समाचार घेताना गायवळ प्रकरणात विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडे बोट दाखवले. विधिमंडळातील उच्च आसनावर बसलेल्या व्यक्तीच्या सूचनेवरून योगेश कदम यांनी शस्त्र परवाना दिल्याचे सांगत रामदास कदम यांनी खळबळ उडवून दिली आहे. या प्रकरणावरून योगेश कदम जसे वादग्रस्त ठरले तसे महायुतीतील विशेषतः भाजप आणि शिंदे गटातील कुरघोडीचे राजकारणसुद्धा समोर आले.

(uddhav.deshdoot@gmail.com)

## पंचांग

तिथी अष्टमी - ११:११:३४ पर्यंत, नक्षत्र पुनर्वसू - ११:५५:०४ पर्यंत, करण कौलव - ११:११:३४ पर्यंत, तैतील - २२:४८:५१ पर्यंत, पक्ष कृष्ण, योग सिद्ध - २८:१०:५७ पर्यंत, वार मंगळवार, सूर्य आणि चंद्र गणना, सूर्योदय ०६:२०:५७, सूर्यास्त १७:५३:०७, चंद्र राशी कर्क, चंद्रोदय २४:२५:००, चंद्रास्त १३:५०:५९, ऋतू शरद.

## भविष्य

**मेष :** मन सज्ज राहील. **वृषभ :** कामावर लक्ष ठेवा. **मिथुन :** कारणे सांगणे टाळा. **कर्क :** संकल्प करा. **सिंह :** खऱ्याची कास धरा. **कन्या :** मन स्थिर राहील. **तूळ :** काही काळ शांतता. **वृश्चिक :** आरोग्याची काळजी घ्या. **धनू :** मित्रांना दुःख सांगा. **मकर :** चर्चेला वाट द्या. **कुंभ :** मन शांत ठेवा. **मीन :** थोडे दुर्मिळ व्हा.

## दिनविशेष

* जागतिक पांढरी काठी दिन. १९५६ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा चार लाख अनुयायांसह दीक्षाभूमी येथे बौद्ध धर्मात प्रवेश. १८८४ - जॉर्ज ईस्टमनने छायाचित्र छापायच्या कागदाचा पेटंट घेतला.

## जाणते व्हा..

करवीर पीठ हे कोल्हापूरमधील एक महत्त्वाचे आध्यात्मिक आणि ऐतिहासिक केंद्र आहे. ते श्री महालक्ष्मी अंबाबाई देवीच्या स्थानामुळे प्रसिद्ध आहे. हे साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण पीठ मानले जाते. करवीर हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे संस्थान आहे.

# स्नेहमेळाव्यांवर सरकारी 'मोहोर'!

**लक्ष्यवेधी**

**एन. व्ही. निकाळे**

कधीकाळी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहबंध कायम राहावा म्हणून काही शाळा, विद्यालये आणि महाविद्यालये त्यांच्या संपर्कात राहतात. वर्षातून एकदा किंवा शाळेचा वर्धापनदिन अथवा एखाद्या विशेष प्रसंगी माजी विद्यार्थ्यांचे मेळावे भरवतात. आपली शाळा वा विद्यालय-महाविद्यालयाविषयी त्यांच्या मनात आपुलकीची भावना टिकून राहते. शालेयोत्तर जीवनात यशस्वी झालेले, सरकारी सेवेत मोठ्या पदांवर पोहोचलेले अथवा व्यवसायात मोठे नाव कमावलेले माजी विद्यार्थी शाळेचे ऋण फेडण्याच्या भावनेतून त्यांच्या शाळा-विद्यालयाच्या गरजापूर्तीसाठी यथाशक्ती मदत करतात.

नाशिक जिल्ह्यात अलीकडे विविध शाळा, विद्यालये आणि महाविद्यालयांचे माजी विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने एकत्र येत आहेत. '३५ वर्षांनी पुन्हा भरली शाळा', '३० वर्षांनंतर जुन्या वर्गमित्रांची पुनर्भेट' यांसारख्या मथळ्यांच्या सचित्र बातम्या वृत्तपत्रांतून हल्ली हमखास वाचायला मिळतात. काही शाळांचे माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यांनिमित्त एकत्र आल्याचे पाहून अथवा ऐकून इतर शाळा-विद्यालयांच्या माजी विद्यार्थ्यांनाही एकत्र येण्याची प्रेरणा मिळत आहे. स्नेहमेळाव्यांना माजी शिक्षक-शिक्षिकांना बोलावण्याची समयसूचकता शाळा व्यवस्थापनांकडून दाखवली जात आहे. माजी विद्यार्थी, माजी शिक्षक आणि शाळांच्या विद्यमान शिक्षकांमधील स्नेहबंध रुजायला, जुळायला मदत होत आहे. मेळाव्यानिमित्त एकत्र येणारे विद्यार्थी शाळा-विद्यालय अथवा शिक्षण संस्थेचे उतराई होण्यासाठी वस्तू अथवा साहित्यरूपाने मदतीचा हातभार लावत आहेत. त्यातून अनेक शाळा-विद्यालयांच्या महत्त्वपूर्ण शैक्षणिक गरजांची पूर्तता होऊ लागली आहे. शाळा-विद्यालयांना लागणाऱ्या सर्वच गोष्टी सरकार अथवा शिक्षण खात्याकडून मिळतीलच, असे नाही. तशी अपेक्षा ठेवणेही हल्लीच्या काळात अवाजवी ठरत आहे. अशा स्थितीत माजी विद्यार्थ्यांकडून मिळणारे सहकार्य हा शाळांसाठी आशेचा किरण ठरू पाहत आहे.



भेटीगाठींसाठी स्वयंस्फूर्तीने एकत्र येणाऱ्या आणि स्नेहमेळावे घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना शाळा-विद्यालयांनी सन्मानाने बोलवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, शालेय विकासासाठी त्यांची मदत घेतली पाहिजे, असा विचार जाणकारांकडून व्यक्त होत आहे. माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यांमुळे राज्य सरकारलादेखील प्रेरणा मिळाली असावी. कारण राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने याच्याशी सुसंगत असा निर्णय नुकताच घेतला आहे. माजी विद्यार्थ्यांना शाळा विकासात थेट सहभागी करून घेण्याचा विचार या निर्णयामागे असल्याचे त्यातील मुद्द्यांवरून स्पष्ट होते. जिल्हा परिषद, महापालिका, खासगी अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये 'माजी विद्यार्थी संघ' स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रत्येक शाळेतील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या माजी विद्यार्थ्यांचा सहभाग या संघात राहील. त्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येईल. माजी विद्यार्थ्यांमधून समितीसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष निवडले जातील. संबंधित शाळा मुख्याध्यापक अथवा प्राचार्य समितीचे सचिव असतील. शिक्षक, पालक, निवृत्त अधिकारी, शिक्षक यांचा सल्लागार सदस्य म्हणून समावेश असेल.

प्रत्येक शाळा-विद्यालयात स्थापन होणाऱ्या माजी विद्यार्थी संघानिमित्ताने माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेशी भावनिक नाते दृढ करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. दरवर्षी शाळा भेट, शिक्षक सन्मान आणि स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम आयोजित केले जातील. 'माजी विद्यार्थी' केवळ एक आठवण न राहता ते त्यांच्या शाळेच्या विकासाचे शिल्पकार ठरतील, असा शालेय शिक्षक विभागाचा दूरदर्शी दृष्टिकोन आहे. मूलभूत गरजांसाठी शाळांनी सतत आपल्याकडे तगादा लावू नये, त्यांची गरज माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून परस्पर भागवली जावी, असा सोयीचा विचार या निर्णयामागे असू शकतो. तथापि यातून नुकसान तसे काही नाही. उलट माजी विद्यार्थी आपापल्या शाळा-विद्यालयांशी पुन्हा जोडले जातील. आपण शाळेत शिकत असताना कोणत्या शैक्षणिक अडचणी आल्या? त्यानंतर शाळा किती आणि कशी बदलली? आज शाळेच्या गरजा काय? शाळेत आता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्या साधनांची कमतरता भासते? त्यांची पूर्तता करण्यासाठी आपण काय करू शकतो? याबाबत माजी विद्यार्थी परस्परांशी संवाद साधतील. मुख्याध्यापकांशी खुलेपणाने बोलू शकतील. त्यातून शाळांच्या छोट्या-मोठ्या गरजा भागवता येतील. वर्गखोल्यांची दुरुस्ती, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, रंगरंगोटी, क्रीडांगण, ग्रंथालय, प्रयोगशाळा तसेच संगणक आदी सोयी-सुविधा करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांना आवाहन करता येईल, असे सरकारला वाटते. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी करिअर आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तज्ज्ञांची व्याख्याने, कार्यशाळा आयोजन, शिष्यवृत्ती तसेच पुरस्कार योजना सुरू करून गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे आदी उपक्रम माजी विद्यार्थी संघाकडून राबवावेत, असे सरकारी निर्णयात नमूद आहे. मुख्य म्हणजे शाळेसाठी रोख स्वरुपात रक्कम स्वीकारली जाऊ नये, असे शासन निर्णयात स्पष्टपणे म्हटले आहे.

शासन निर्णय आता झाला आहे. त्याआधीपासून कितीतरी माजी विद्यार्थी आपापल्या शाळांशी जोडले गेले आहेत. शाळांना मदत करत आहेत. शाळांच्या अडचणी दूर व्हायला मदत होत आहे. कदाचित ते पाहूनच 'माजी विद्यार्थी संघ' स्थापन करणे आणि त्या माध्यमातून शाळा विकासाचा नवा मार्ग विकसित करण्याची कल्पना शालेय शिक्षण विभागाला सुचली असावी. तरीसुद्धा या निर्णयाचे स्वागतच होईल.

## द्वैत-अद्वैत

### रिमोट कंट्रोल

जमिनीत पेरलेल्या एकेका दाण्यापासून असंख्य दाण्यांचे कणीस वाऱ्यावर डोलते. अनेक फांद्यांमध्ये विस्तारलेले, करोडो पाना-फुलांनी सजलेले, शेकडो वर्षे जगणारे महाकाय वृक्ष निसर्गाची किमया दाखवतात. निसर्गापुढे मानवी बुद्धिमत्तेच्या खुजेपणाची जाणीव होते. चिमुकले बीज पृथ्वीतत्त्वाच्या कुशीत दडते. जलतत्त्व त्याला प्रेमाने रुजवते. आकाशतत्त्व मुळांना जमिनीत आणि खोडाला जमिनीबाहेर अवकाश देते. प्रकाशरूप तेजतत्त्व रोपाच्या अन्ननिर्मितीसाठी प्रकाश संश्लेषण प्रक्रियेला सहाय्यभूत होते. वायुतत्त्व ऑक्सिजन, कार्बन डाय ऑक्साईड पुरवते. पृथ्वी, जल, आकाश, तेज, वायू अशा पंचमहाभूतांनी सजीव सृष्टी विस्तारते. सृष्टीनिर्मितीचे सामर्थ्य असणाऱ्या अदृश्य हातांच्या पाळण्यावर अवघी सृष्टी झुलते, तिचे पालनपोषण होते. सारे नकळत घडते तसे अचानक बिघडतेदेखील. पृथ्वीतत्त्व थरथरते, भूकंप होतो. जलतत्त्वाच्या लहरी अतिवृष्टीच्या पडद्याआड सभोवतालची सृष्टी ढकलून नाहीशी करतात. वायुतत्त्वाच्या प्रकोपाने, वादळाने होत्याचे नव्हते होऊन जाते. अग्नीच्या रूपाने तेजतत्त्व प्रगटते तेव्हा सारे क्षणार्धात भस्मसात होते. पंचतत्त्व मानवी बुद्धिमत्तेला नामोहरम करते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा शोध लावणारी नैसर्गिक बुद्धिमत्ता माणसाला दिलीय पण त्याने सर्वांचा रिमोट कंट्रोल स्वतःपाशीच ठेवलाय!

■ प्रतिभा औटी-पंडित

## पत्रास कारण की,

### हा बालेकिल्ला तसाच ठेवा

वाढत्या गुन्हेगारीला आटोक्यात आणण्यासाठी सुरू केलेली कारवाई स्तुत्य असून खऱ्या अर्थाने नाशिक पोलीस आता ॲक्शन मोडवर आले आहेत. गुन्हेगारांच्या मनात खऱ्या अर्थाने धाक निर्माण व्हावा व गुन्हेगारीला आळा बसावा यासाठी पोलिसांनी सुरू केलेले टवाळखोरांचे, गुंडांचे आश्रयस्थाने उद्ध्वस्त करणे, अनधिकृत होर्डिंग्जवरील, अनधिकृत धंद्यांवरील कारवाई, गुन्हेगारांवरील कारवाईचे स्वागत करण्यात येत असून पोलीस आयुक्तांचे अभिनंदन! यामुळे नाशिककरांच्या मनातील भीती कमी होऊन भयमुक्त नाशिक होण्यास मदत होईल.

■ ॲड. सुरेश रा. आव्हाड, नाशिक

### साखर उद्योगात बायो सीएनजी पर्व

सर्वत्र स्वस्त व पर्यावरणपूरक इंधन बायो सीएनजीची ओळख आहे. या प्रकारच्या इंधननिर्मितीसाठी केंद्र सरकारने प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले आहे. त्यामुळे देशातील पंधरा साखर कारखान्यांमध्ये हा हरित इंधन वायुनिर्मितीचा प्रकल्प कार्यान्वित होत आहे. उद्योगातील हे बदलाचे वारे लक्षात घेऊन अनेक कारखान्यांनी सर्वसाधारण सभेत हा प्रकल्प सुरू करण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. या प्रकारचे पूरक उद्योगच ही कारखानदारी वाचवतील.

■ शिवाजी जाधव, आडगाव

### महाभारत ते एकविसावे शतक

महाभारतातील संघर्ष हा केवळ पांडव-कौरवांमधील नव्हता तर तो अन्यायाविरुद्धच्या लढाईचे प्रतीक होता. आज एकविसाव्या शतकातही परिस्थिती तशीच आहे. लोभ, भ्रष्टाचार, अहंकार आणि स्वार्थ समाजाला पोखरत आहेत. धर्म, सत्य आणि न्यायाची बाजू घेणाऱ्यांना अजूनही संघर्ष करावा लागतो. महाभारत शिकवते की, अन्याय कितीही बलाढ्य असला तरी सत्याचा विजय ठरलेलाच असतो. आजच्या पिढीने तंत्रज्ञान प्रगती यासोबत महाभारताची ही शिकवण आचरणात आणली तर समाज अधिक न्यायसमतोल आणि सुखी होईल.

■ किशोरकुमार दीक्षित, पिंपळगाव बसवंत

**आपली पत्रे deshdooteddit@gmail.com येथे पाठवावी.**